संक्षिप्त **फौ. ख. क्र. २९५/२०२३**
**सरकार -वि.- सचिन**
**नि.क्र. ०२**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी</u>**

**<u>मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव - राकेश रमेश गेडाम,
वय २९ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – तास कॉलोनी भिवापूर ता. भिवापूर जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री व्ही.यु.मिरचे यांचे मार्फत</u>**

१. दि. १६.०५.२०२१ रोजी पोलीसांनी मला कुठेही बोलावले नव्हते. मी पोलीस स्टेशनला असताना माझी सही घेतली. आता मला नि.क्र. ४ वरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास – सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. १६.०५.२०२३ रोजी पोलीसांनी मला मरु नदी जवळ पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तेथे अपघात झाल्याच्या ठिकाणाचा पंचनामा केला, मला वाचून दाखविला व माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी निलेश पाल यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री. नागोशे यांचे मार्फत</u>**

३. नाकारला.

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
( एस.जे. लाड )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक ०७.१२.२०२४.